दैनिक
wwww.lokaarambh.com
# लोक आरंभ
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक ११३ | सोमवार १३ एप्रिल २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू
Beed | year - ०4 th | Issue113 | Monday 13 April 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# शेतकऱ्यांना कांद्याने रडवले, खिशाला मोठा कात्री, दर कमी होण्यामागे कारण काय?

## बाजारपेठेतील स्थिती आणि भविष्यातील आव्हाने

वाशी एपीएमसी मार्केटमध्ये शनिवारी कांद्याचे घाऊक दर ८ ते १२ रुपयांच्या दरम्यान नोंदवले गेले. गेल्या दोन महिन्यांपासून सरासरी १२ ते १५ रुपयांवर असलेले दर आता खाली आल्याने शेतकऱ्यांचा हिरमोड झाला आहे.बाजार निरीक्षकांच्या मते, मागील वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत हे दर ५० टक्क्यांनी कमी आहेत. विशेष म्हणजे, घाऊक बाजारात कांदा स्वस्त झाला असला तरी, मुंबईतील किरकोळ बाजारात तो २० ते २४ रुपये किलो या दराने ग्राहकांना मिळत आहे. दरम्यान आता ही युद्धजन्य परिस्थिती तशीच राहिल्यास आणि निर्यात पूर्ववत न झाल्यास, पुढील काळात कांद्याचे दर अजून खाली येण्याची भीती व्यापारी व्यक्त करत आहेत.

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या दुहेरी संकटात सापडला आहे. लाल कांद्यानंतर आता नव्याने बाजारात दाखल होत असलेल्या उन्हाळी कांद्याच्या दरातही मोठी घसरण झाली आहे. लासलगावसारख्या आशियातील सर्वात मोठ्या कांदा बाजार समितीत कांद्याला अवघे ८ ते १२ रुपये किलो भाव मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांना लागवडीसाठी केलेला खर्च वसूल करणेही कठीण झाले आहे. या परिस्थितीमुळे बळीराजाच्या आर्थिक अडचणीत मोठी भर पडली आहे. कांद्याचे दर का घसरतात?

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा थेट परिणाम भारताच्या कांदा निर्यातीवर झाला आहे. आखाती देशांमधील मागणी घटल्याने व्यापाऱ्यांच्या गोदामांमध्ये मोठा साठा पडून आहे. तसेच या युद्धामुळे जागतिक स्तरावर



कंटेनरच्या भाड्यात प्रचंड वाढ झाली आहे. एकेकाळी ६०० डॉलरमध्ये उपलब्ध होणारा कंटेनर आता ६,५०० डॉलरपर्यंत महागला आहे, ज्यामुळे निर्यातीचे गणितच बिघडले आहे. बाजारात आता मोठ्या प्रमाणात नवीन उन्हाळी कांदा दाखल होत आहे. तर दुसरीकडे, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील कांदा शेजारील राज्यांमध्ये स्वस्त दरात विक्रीसाठी उपलब्ध असल्याने महाराष्ट्रातील कांद्याला मागणी कमी झाली आहे. त्यासोबतच नाफेड (NAFED) आणि एनसीसीएफ (NCCF) मार्फत केल्या जाणाऱ्या खरेदीचे उद्दिष्ट यंदा ५ लाख मॅट्रिक टनावरून थेट २ लाख मॅट्रिक टनावर आणण्यात आले आहे, त्यामुळे बाजारातील अतिरिक्त साठ्यावर नियंत्रण मिळवणे कठीण झाले आहे.

# जलजीवन पाणीपुरवठा योजनेत एक कोटी घोटाळा; राठोड तांड्यावर टंचाईचे सावट!

**ग्रामस्थांची जिल्हाधिकारी-सीईओ यांच्याकडे कारवाई करण्याची मागणी**

गेवराई : प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मौजे मारफळा ग्रामपंचायत अंतर्गत राठोड तांडा येथे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेल्या तब्बल १ कोटी १० लाख रुपयांच्या निधीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहाराचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. निकृष्ट दर्जाचे काम करून केवळ कागदोपत्री नळयोजना पूर्ण दाखवून निधी उचलण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

तांड्यातील नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहेत. परिणामी, आजही राठोड तांड्यातील नागरिकांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून, पिण्याच्या पाण्यासाठी कोसो दूर भटकंती करावी लागत आहे. यापूर्वीही राष्ट्रीय पेयजल योजना अंतर्गत २९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र त्या वेळीही



काम अर्धवट सोडून ग्रामस्थांना पाण्यापासून वंचित ठेवण्यात आले, असा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २०१५ साली ग्रामस्थांनी निवेदन देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणही केले होते, मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, त्यामुळे ग्रामस्थांमधून संताप व्यक्त होत आहे.

सध्या दुष्काळाची तीव्रता वाढत असताना, सर्व सुविधा उपलब्ध असूनही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच अपूर्ण योजना तात्काळ पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मनोज राठोड व ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण तसेच रोड क्र. २२२ (कांबी फाटा) येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबत दि. १० एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद बीड) व गटविकास अधिकारी (पंचायत समिती गेवराई) यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. आता प्रशासन या गंभीर प्रकरणात काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## समतेचा संदेश देणारा भव्य सोहळा : माजलगावात फुले जयंतीनिमित्त हजारोंची उपस्थिती



माजलगाव प्रतिनिधी..

माजलगाव येथे महात्मा जोतीराव फुले जयंतीनिमित्त आयोजित भव्य व्याख्यान सोहळ्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ. रापमाल महाराज धारकर यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने समता, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रभावी संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचवला. हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून नागरिकांनी समतेच्या विचारांचे “सोने” लुटले.


कार्यक्रमाचे उद्‌घाटन अजय भैय्या शिंदे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी दत्ता भैया विसावळे होते. विशेष उपस्थिती म्हणून बाबुरावजी पोटभरे, ज्ञानेश्वर नाना मेंडके, तुकाराम बापू येवले, कल्याण भाऊ आबुज आणि अशोकरावजी तिडके यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली.

प्रमुख पाहुण्यांमध्ये शिवप्रसाद आप्पा खेत्री, राजेश घोडे, नारायण गोले, लक्ष्मणराव गायकवाड, ज्ञानेश्वर सरोदे, बळीराम यादव, संतोष देवकते आणि धम्मानंद भाऊ साळवे यांचा समावेश होता. विविध क्षेत्रातील मान्यवर, सरपंच, युवा नेते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद गोचडे सर यांनी केले. संयोजनाची धुरा विलास नेमाणे, किशोरजी पांचाळ व कमिटी सदस्यांनी सांभाळली. या सोहळ्यामुळे समाजात समता, बंधुता आणि जागृतीचा संदेश अधिक दृढ झाला

# “ नारी शक्ती वंदन “ विधेयक म्हणजे मोदी सरकारने केलेला महिलांचा सन्मान

**-भाजप जिल्हाध्यक्ष सुवर्णा लांबरुड**



बीड प्रतिनिधी -

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात काही निर्णय हे केवळ कायदे नसून ते सामाजिक परिवर्तनाचे महाद्वार ठरतात.जसे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने संसदेत आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे ‘नारी शक्ती वंदन विधेयक’ मंजूर करून असाच एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. हे विधेयक केवळ राजकीय आरक्षणापुरते मर्यादित नसून ते देशातील कोट्यवधी महिलांच्या सन्मानाचे आणि त्यांच्या कर्तृत्वाला दिलेल्या अधिकृत मान्यतेचे प्रतीक आहे. महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्यामुळे देशाच्या राजकारणात त्यांचा सहभाग वाढणार आहे.आता देशाच्या धोरण निर्मितीतही त्यांचा सक्रिय सहभाग वाढणार आहे. आजवर अनेक क्षेत्रांत महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे, पण राजकारणात त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. या विधेयकामुळे व ऐतिहासिक निर्णयामुळे आता ग्रामपंचायतीपासून ते संसदेपर्यंत महिलांचा बुलंद आवाज ऐकू येईल. यामुळे केवळ महिलांच्या संख्येत वाढ होणार नाही, तर देशाच्या राजकीय संस्कृतीत संवेदनशीलता आणि नियोजनाची नवी दृष्टी येईल. देशाची एक वेगळी ओळख निर्माण होईल. ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक महिलांना आपले कौटुंबिक, सामाजिक किंवा आरोग्याचे प्रश्न पुरुषांसमोर मांडताना संकोच वाटत असे. जेव्हा एक महिला खासदार म्हणून संसदेत उभी राहते, तेव्हा ती केवळ एक लोकप्रतिनिधी नसते, तर ती त्या भागातील हजारो महिलांचा विश्वास असते. महिला खासदारांच्या वाढत्या संख्येमुळे महिलांच्या सुरक्षिततेचे, शिक्षणाचे आणि रोजगाराचे प्रश्न थेट संसदेत आणि विधानसभांमध्ये कोणत्याही भीतीशिवाय मांडले जातील. ‘महिलाच महिलांचे प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे समजू शकते’ हे तत्त्व आता खऱ्या अर्थाने अमलात येईल.

असे म्हटले जाते की, “जेव्हा एक महिला शिकते, तेव्हा ती केवळ स्वतःचा विकास करत नाही, तर संपूर्ण घर पुढे नेते.” महिलांमध्ये उपजतच व्यवस्थापन आणि नियोजनाची मोठी कला असते. कुटुंबाचे आर्थिक आणि सामाजिक नियोजन त्या अत्यंत कौशल्याने करतात. हेच कौशल्य जेव्हा देशाच्या प्रशासनात आणि राजकारणात वापरले जाईल, तेव्हा देशाच्या प्रगतीचा वेग नक्कीच वाढेल. महिलांच्या अंगभूत गुणांमुळे सरकारी योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल, ज्याचा फायदा देशाच्या सर्वांगीण विकासाला मिळेल.

**महिला होतील सक्षम आणि निर्भीड**

या आरक्षणामुळे महिलांमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण होईल. जेव्हा त्या पाहतील की त्यांच्यातीलच एक भगिनी संसदेत देशाचे कायदे बनवत आहे, तेव्हा त्या स्वतःला सक्षम आणि निर्भीड समजतील. हे विधेयक महिलांना केवळ राजकीय अधिकार देत नाही, तर त्यांना समाजात आदराचे स्थान मिळवून देते. यामुळे येणाऱ्या पिढीतील मुलींना राजकारण आणि समाजकारणात येण्यासाठी मोठी प्रेरणा मिळेल, ज्यामुळे देशाच्या भविष्यातील नेतृत्वाची फळी अधिक मजबूत होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे आणि भारतीय जनता पार्टीने महिलांना दिलेल्या सन्मानामुळे आज महिला शक्ती खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आली आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार केल्यास, प्रत्येक महिलेचा स्वाभिमान जपण्याचे काम या सरकारने केले आहे. महिलांना केवळ ‘मतदार’ न मानता त्यांना ‘देशाचे शिल्पकार’ म्हणून संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणे आवश्यक आहे. ‘नारी शक्ती वंदन’ हे केवळ एका विधेयकाचे नाव नसून, ते नव्या भारताच्या स्त्रीशक्तीला दिलेली मानवंदना आहे.

## बंणजारा विरासत संघाच्या सदस्य नोंदणी उत्स्फूर्त प्रतिसाद

**समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – शैलेश भैय्या जाधव**



बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या “बंणजारा विरासत संघ” या संघटनेच्या सदस्य नोंदणी अभियानाला सध्या उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून, समाजातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर सहभागी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्याचे माननीय मंत्री संजय भाऊ राठोड साहेब यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या अभियानामुळे बंजारा समाजात नवचैतन्य निर्माण झाले आहे. समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय सशक्तीकरणासाठी संघटना सातत्याने कार्यरत असून, समाजाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर शैलेश भैय्या जाधव यांनी समाज बांधवांना आवाहन करताना सांगितले की, “आजच्या घडीला बंजारा समाजाने एकजूट होणे अत्यंत गरजेचे आहे. संघटनेच्या माध्यमातून आपल्या हक्कांसाठी प्रभावीपणे लढा देता येईल. त्यामुळे प्रत्येक बांधवाने पुढे येऊन सदस्य नोंदणी करून संघटनेला बळकटी द्यावी.”

तसेच, माननीय संजय भाऊ राठोड यांच्या सक्षम नेतृत्वाखाली बंजारा समाज निश्चितच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

या सदस्य नोंदणी अभियानाला आगामी काळात आणखी वेग मिळणार असून, जास्तीत जास्त समाज बांधवांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा उल्लेखनीय निकाल

माजलगाव : परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाने यंदाच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून विद्यार्थ्यांनी उत्तम गुणवत्तेचे प्रदर्शन करत महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे. बीएएमएस द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट टक्केवारी मिळवत यशाची नोंद केली आहे. परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा निकाल 88.63% लागला असून या निकालामध्ये भावना शहाजी जाधव हिने 70.33% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. धनवर्षा दयानंद बिरादार हिने 69.76% गुणांसह द्वितीय, तर अंकिता सुरेश उपरे हिने 69.19% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.


महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, नियमित अध्यापन पद्धती, तसेच विद्यार्थ्यांची



भावना शहाजी जाधव 70.33%



धनवर्षा दयानंद बिरादार 69.76%



अंकिता सुरेश उपरे 69.19%

मेहनत आणि चिकाटी यामुळे हा यशस्वी निकाल शक्य झाला आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे उत्तम निकाल देण्याचा संकल्प महाविद्यालयाने व्यक्त केला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

दैनिक
लोकआरंभ
सोमवार १३ एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



# आमदारकी सोडून नगराध्यक्ष व्हा; अरुण मुंढे यांचा आमदार मोनिका राजळे यांना खोचक टोला

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
शेवगाव नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेवरून शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेना उपनेते अरुण मुंढे यांनी पत्रकार परिषदेत आमदार मोनिका राजळे यांच्यावर जोरदार टीका करीत आमदारकीचा राजीनामा देऊन नगराध्यक्ष व्हा आणि नगराध्यक्ष माया मुंढे यांना आमदार करा, असा खोचक टोला लगावला.

शहराच्या सर्वांगीण पाणीपुरवठा सुधारण्यासाठी संभाजीनगर येथील यश इनव्हेटिव्ह सोल्युशन कंपनीकडून नव्या योजनेचे सादरीकरण करण्यात आले. या योजनेनुसार 123 किमी पाइपलाईन वाढवून 266 किमी करण्यात येणार असून, 143 किमी अतिरिक्त पाईपलाईन टाकली जाणार प्रत्येकी 8 लाख लिटर क्षमतेचे दोन जलकुंभ उभारले जाणार आहेत. सुमारे 75 हजार लोकसंख्येसाठी 14 हजार नळजोडण्या देण्याचे नियोजन आहे. योजना सात झोनमध्ये विभागली जाणार आहे. यासाठी 50 ते 60 कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात येणार असून जायकवाडी धरणातून पाणी उचलून गहिले वस्ती येथील शुद्धीकरण केंद्राद्वारे शहरात पुरवठा केला जाणार आहे. ही योजना वर्षभरात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

पूर्वीच्या योजनेत मानव सेवा (धुळे) व राजेंद्र सनेर या कंपन्यांनी शहरातील सुमारे 55 टक्के भाग वगळल्याचा आरोप मुंढे यांनी यावेळी केला. नव्या योजनेत हा भाग समाविष्ट करून अतिरिक्त निधीचा प्रस्ताव देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, काही नगरसेवकांना विशिष्ट कंपनीच्या बाजूने मतदान करण्यासाठी फोनद्वारे दबाव टाकण्यात आल्याचा गंभीर आरोपही मुंढे यांनी केला. मात्र, नगरसेवकांनी दबाव झुगारून संबंधित कंपनीला नाकारल्याचे ते म्हणाले. भविष्यात अशा हस्तक्षेपाचे रेकॉर्डिंग सार्वजनिक करण्याचा इशाराही त्यांनी दिला. गेल्या 9 एप्रिल रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत कोल्हापूरच्या स्वस्तिक कंपनीला मुदतवाढ देण्याच्या मुद्यावरून सभागृहात खडाजंगी झाली. कामातील त्रुटींमुळे मुदतवाढ देण्याची गरज असल्याचा एक गटाचा दावा असताना काही नगरसेवकांनी ब्लॅकलिस्टची मागणी केल्याने वाद चिघळला. लेखी तक्रार नसताना केवळ विरोधासाठी विरोध केला जात आहे, असा आरोप मुंढे यांनी केला.

मुंढे यांनी भाजप व काही नगरसेवकांवर शहराच्या विकासकामांत जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केल्याचा आरोप करीत, वादग्रस्त एजन्सींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे म्हटले. पाणीयोजनेत खोडा घालण्याचे राजकारण सुरू असल्याचाही त्यांनी आरोप केला.यावेळी माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, ताहेर पटेल, पिनू मगरे, आशुतोष डहाळे, कैलास तिजोरे, अमर पुरनाळे, साईनाथ आधाट, बाबासाहेब लांडे, प्रवीण भारस्कर, रोहित काथवटे, हरीश भारदे, संतोष जाधव, जाकीर कुरेशी, नंदू मुंढे तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व संबंधित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## संपादकीय

# जागतिक कोकणी भाषा दिन




प्रशांत बाफना 8055440385

“ ९ एप्रिल हा जागतिक ‘कोकणी भाषा दिन’ म्हणून साजरा करण्यात येतो तद्अनुषंगाने भाष्य करणाऱ्या व अनभिज्ञ वाचकांच्या ज्ञानात भर घालणाऱ्या या अभ्यासपूर्ण लेखाचा सुसूत्र,सविस्तर गोषवारा असा:—

कोकणी भाषा ही जगातील सर्वांत गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषा बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे.मराठीची धाकटी बहीण म्हणून ओळखण्यात येणारी ‘कोकणी भाषा’ ही गोव्याची राज्यभाषा असून राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंघ बोलीभाषा नसून तिच्या एकूण आठ प्रकार आहेत.गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एकच असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज भाषेचा प्रभाव आहे.
महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणीही वेगळी आहे शिवाय वारली,
कोणकोणी,डांगी,
चित्पावणी,मालवणी वगैरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या उपभाषा आहेत.इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वांत दक्षिण टोकाकडील भाषा आहे.तिचे नाते मराठी आणि गुजारातीशी आहे.कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रवीड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत.
कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००६ साली हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येते. मराठीत इकडे,’इथे’ तर कोकणीत होतो ‘हांगा’. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजू शकतो.कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे.अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात.हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत.असो. कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा.कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा देतो

# सर, तुम्ही गुरूजी व्हा - डॉ. स्वाती काटे

# मराठवाडा साहित्य संमेलनात बालकुमार मेळावा

बाबा आमटे साहित्य नगरी, शांतिवन - /प्रशांत बाफना

‘सर तुम्ही गुरूजी व्हा’ असे सांगत, बालकुमारांचे विचार खूप मोठे असतात असे प्रतिपादन डॉ. स्वाती काटे यांनी ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनात दि. ११ रोजी दुपारच्या सत्रात बालकांशी संवाद साधताना म्हटले. त्र्यंबक वडसंगकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवाद कार्यक्रमात माधव गव्हाणे, कल्पना हेलसकर, डॉ. विठ्ठल जाधव यांनी सहभाग घेतला.

‘बालकुमार साहित्य संमेलन मी केलेले प्रयोग’ या विषयी मुलांशी गप्पा, गाणी, गोष्टींच्या माध्यमांतून माधव गव्हाणे (परभणी) यांनी मुलांशी संवाद साधला. मुलांचा स्क्रीन टाईम कमी करत, पुस्तकाचे वाचन वाढवून पालकांनी मुलांशी अनुकरणीय



वर्तन केले पाहिजे. पुस्तक वाचणारी माणसं मोठी होतात असे ते म्हणाले. त्र्यंबक वडसंगकर (परभणी) यांनी ‘जगण्याचा खो’ उपक्रम सांगत साभिनय गोष्ट सांगून मुलांना हसवत ठेवले. मनोरंजनातून जगण्याचे



तत्त्व सांगितले. कल्पना हेलसकर (सेलू) यांनी ‘गरीब बहीण’ ही गोष्ट सांगत साने गुरुजी संस्कार कथामाला, जागर श्यामच्या कथांचा, उन्हाळ्याची सुट्टी पुस्तकांशी गट्टी या उपक्रमाविषयी माहिती दिली. डॉ. विठ्ठल जाधव यांनी मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य अपेक्षित आहे अशी अपेक्षा व्यक्त केली बालकुमार साहित्य संमेलनाचे महत्त्व सांगितले तसेच विनोदातून मुलांचे मनोरंजन केले. यावेळी रजनी नागरगोजे, डॉ. पृथ्वीराज तौर, आसाराम लोमटे, रामचंद्र तिरूके, संतोष तांबे, रामचंद्र काळुंखे, गणेश मोहिते, कावेरीताई नागरगोजे, नारायण काळे, सचिन कुंभारकर, सचिन ढाकणे, अशोक नन्नवरे, अमोल कांबळे, दत्ता चित्रे, भारत कारंडे, मनिषा भोसले, कालिंदा घाडगे, विकास खेडकर यांचेसह विद्यार्थी, पालक यांची उपस्थिती होती. ज्ञानेश्वर राऊत यांनी आभार मानले

# प्रहार चे अमजद खान यांचा वाढदिवस शालेय साहित्य वाटप करून साजरा केला.

माहूर प्रतिनिधी जावेद शेख

प्रहार जनशक्ति पक्षाचे माहुर ता.प्रमुख अमजद खान यांचा वाढदिवस अनाठाई खर्च न करता त्यानी मित्र परिवारा सोबत फळ, वही, पेन वाटप करून १० एप्रिल रोजी कोलामखेड येथिल जिल्हा परिषद शालेत शालेय साहित्य वही पेन वाटप करुन वाढदिवस साजरा केला.
सामाजिक बांधिलकी जपणारा वाढदिवस

प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका प्रमुख अमजद खान यांचा वाढदिवस यंदा वेगळ्याच पद्धतीने आणि सामाजिक जाणीव ठेवत साजरा करण्यात आला. कोलामखेडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वही व पेन वाटप करून त्यांनी आपल्या वाढदिवसाला एक अर्थपूर्ण स्वरूप दिले.
या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, शिक्षणासाठी आवश्यक



साहित्य मिळाल्याने त्यांना नवी उभारी मिळाली.
“वाढदिवस म्हणजे केवळ आनंद साजरा करणे नाही, तर समाजासाठी काहीतरी देण्याची संधी आहे,” हा संदेश अमजद खान यांनी आपल्या कृतीतून दिला.
यावेळी त्यांच्या सोबत शाळेतील विद्यार्थी मित्र परिवार सह पत्रकार साजिद खान, राजीक शेख सह अदी बांधव उपस्थित होते.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी 23 एप्रिल रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

अहिल्यानगर, /प्रशांत बाफना :
राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाच्या दिवशी, गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.
राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे.
ही सुट्टी मतदारसंघाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसह कामानिमित्त मतदारसंघाबाहेर असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. त्यामुळे सर्व पात्र मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावणे सुलभ होणार आहे.

सदर अधिसूचना राज्य व केंद्र शासनाच्या कार्यालयांसह निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम तसेच इतर आस्थापनांनाही लागू होणार आहे

# कन्नड ग्रामीण भागात संडास मुक्त अभियान फक्त नावालाच

## उघड्यावर सोचास बसणाऱ्यांच्या संकेत वाढ ग्रामीण भागात लोटा पुन्हा सुरूच

मुजीब खान कन्नड_______
शासन दरवर्षी शौचालय व स्वच्छतेवर कोट्यावधी रुपये खर्च करीत असून सुद्धा कन्नड ग्रामीण भागात खेड्यापाड्यात उघड्यावर शोचास बसणाऱ्यांची संख्या वाढली असून लोटा पुन्हा सुरू झाल्याने लोक कुठेही शोचास बसत असल्याने दुर्गंधी पसरत असल्याने स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे ग्रामीण भागात सर्वात जास्त प्रभाव दिसत आहे शासनाने लाखो रुपये खर्च करून हम ना बदलेंगे असे दिसून येत आहे ग्रामीण भागात ग्राम विकास अधिकारी यांच्याकडून मात्र या सर्व प्रकारावर मौन बाळगले जाते खरे तर गावातील स्वच्छता बाबत सर्वात जास्त जबाबदारी ही सरपंच सह ग्रामसेवक यांची आहे मात्र त्यांनी वारंवार



सूचना देऊनही नागरिक ऐकत नसल्याने सतत उघड्यावर शौचालय चालू आहे संबंधित तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालयातून उघड्यावर शोचास बसणाऱ्यांवर कारवाई करावी बऱ्याच ठिकाणी गाव तलाव गाव लगत रोडवर व रोडच्या कडेला मोकळ्या जागेत इतर चांगल्या ठिकाणी शोच्यास बसतात लोकांना कुठे बसावे हे सुद्धा कळत नाही शासनाने प्रत्येक घरोघरी सोचालय बांधण्यासाठी सक्ती करून सुद्धा आजही लोक उघड्यावर शोचास बसत आहेत गाव सुरू झाला की रस्त्याच्या दोन्ही बाजूंने शोचास बसल्याने दुर्गंधी पसरत आहे कुजखेडा येथे ग्रामपंचायतच्या बाजूलाच शोचास बसत आहे काही गावात हागणदारी मुक्त म्हणून बोर्ड लावले आहे काही गावात बोर्ड नावालाच दिसून येत आहे गावांच्या सुरुवातीला किंवा गावांच्या शेवटी रोडच्या कडेला मोकळ्या जागेत शोच्यास बसत असल्यामुळे दुर्गंधी पसरत असते खरे म्हणजे ग्रामीण भागात शौचालयाचा वापर न करता इतर वस्तू ठेवून बाहेर उघड्यावर जाऊन शोच्यास जात आहे या संदर्भात शासनाने सक्ती करून उघड्यावर शोचास बसणाऱ्या दंड लावून कारवाई करावी जेणेकरून शहर व ग्रामीण भागातील गावात दुर्गंधी होणार नाही स्वच्छता राहील त्यामुळे गाव शहर रोगराई मुक्त होणार असून पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना प्रत्येक ग्रामपंचायत आदेश नगरपालिकेचे मुख्याधिकारी कर्मचाऱ्यांना आदेश देऊन उघड्यावर दुर्गंधी पसरणाऱ्या वर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील सुज्ञ नागरिकाकडून होत आहे

# भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जबाबदारी आणि कर्तव्य ओळखून समाजात वागले पाहिजे .

## प्रवक्ता राम कुलकर्णी

\माजलगाव (प्रतिनिधी)
सध्याच्या राजकीय परिस्थितीत केंद्र आणि राज्यात भाजप सत्ता स्थानी आहे, याचा अर्थ सर्वसामान्य जनतेचा पक्षावर प्रचंड विश्वास वाढला आहे. हा विश्वास भाजपाच्या संस्कृती, विचारसरणी आणि शेवटच्या घटकापर्यंत काम करण्याच्या भूमिकेमुळे निर्माण झाला आहे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले.
पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत किटी आडगाव ता माजलगाव येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.अध्यक्षस्थानी पांडुरंग झोडगे होते भाजपा नेते प्राध्यापक देविदास राव नागरगोजे भाज्युमचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे मंडळाचे अध्यक्ष सौं .रूपालीताई कचरे , हानुमान कदम अँड.भाग्यश्री ढाकणे डॉ.अभिजीत सोळुंके आदी मान्यवरांची उपस्थिती होती .समारोपाच्या सत्रात संजय आंधळे यांनी कार्यविस्तार भाग्यश्री ढाकणे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना तर देविदास नागरगोजे यांनी वैचारिक जडणघडण या विषयावर प्रकाश टाकला . बोलताना राम कुलकर्णी यांनी “कार्यकर्ता आणि त्याची कार्यपद्धती” या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.
कुलकर्णी म्हणाले, “निःस्वार्थपणे काम करणारा तोच खरा कार्यकर्ता असतो.” पक्षाचा कार्यकर्ता हा निष्ठा, विचार आणि तत्वांनी प्रेरित असावा. भाजपात व्यक्तीस्वार्थासाठी




नव्हे, तर देश आणि समाजहितासाठी काम केले जाते. सुसंस्कृतपणा, सेवाभाव, समर्पण आणि त्याग हीच कार्यकर्त्याची खरी ओळख आहे, असे त्यांनी नमूद केले.
कार्यकर्त्यांनी आपल्या आचरणातून समाजात आदर्श निर्माण करावा. केंद्र आणि राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना जाणून घेऊन त्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारीही कार्यकर्त्यांची असल्याचे त्यांनी सांगितले. “तोंडात साखर, डोक्यात बर्फ आणि पायात चक्र” हे गुण अंगी बाळगल्यास कार्यकर्त्याचे नेतृत्व अधिक सक्षम होते, असेही ते म्हणाले.
पक्षात काम करताना अंतर्गत मतभेद आणि गटबाजी बाजूला ठेवून पक्ष, झेंडा आणि नेतृत्व याबद्दल निष्ठा ठेवणे आवश्यक आहे. संघटन मजबुतीसाठी कार्यकर्त्यांनी



सातत्याने परिश्रम घ्यावेत, तसेच प्रत्येक ठिकाणी पक्षाची विचारधारा आणि तत्वे दिसली पाहिजेत, असे आवाहन त्यांनी केले.
भाजपा हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून २५ कोटींपेक्षा अधिक सदस्यसंख्या आहे. त्यामुळे “आपण पक्षात आहोत हीच आपली ताकद आहे,” हे लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता जनतेच्या सेवेसाठी रात्रंदिवस कार्यरत राहावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.
कार्यक्रमास स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.वर्ग प्रमुख प्रदीप जाधव विष्णुपंत आगे शरद कचरे कल्याण शेफ सुधाकर रासवे सचिन तौर शरद पवार शरद पवार पवार यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले .या वर्गाचे सूत्रसंचालन आनंद जगताप यांनी केले .

# खाकीचा दणका..एलसीबीने कत्तलखान्यावर धाड टाकून

## ५ आरोपींना ठोकल्या बेड्या...

अहिल्यानगर (प्रशांत बाफना):-
जिल्ह्यात गोवंश हत्या आणि अवैध मांस विक्री विरुद्ध पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उघडलेल्या मोहिमेला मोठे यश आले आहे. शेवगाव शहरातील ईदगाह मैदान परिसरात सुरू असलेल्या एका अवैध कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) रविवारी पहाटे छापा टाकून पाच जणांना बेड्या ठोकल्या.या कारवाईत पोलिसांनी २०० किलो गोमांस आणि एका गोवंशीय जनावराची सुटका केली आहे.गुप्त बातमीदाराने दिले ‘लोकेशन’ स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथक शेवगाव भागात गस्तीवर असताना, ईदगाह मैदाना शेजारी मुनावर अब्बास कुरेशी हा त्याच्या साथीदारांसह गोवंश कत्तल करून मांस विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पोलिसांनी वेळ न घालवता पहाटेच्या अंधारात सापळा रचला आणि कत्तलखान्यावर धाड टाकली.
छापा टाकला तेव्हा काही इसम प्रत्यक्ष गोमांसाची विक्री करत होते. पोलिसांनी घटनास्थळावरून पाच जणांना ताब्यात घेतले असून त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:मुनावर अब्बास कुरेशी (वय ४८, रा. शेवगाव),अदनान मन्सुर कुरेशी (वय २३, रा. सम्राट अशोकनगर, शेवगाव),जावेद अहमद शेख (वय ३५, रा. नायकवाडी मोहल्ला,शेवगाव),जाकीर मोहम्मद शेख (वय ४०, रा. शेवगाव),जावेद फकीर मोहम्मद शेख (वय ४२, रा. शेवगाव),६८ हजारांचा मुद्देमाल जप्त या कारवाईत पोलिसांनी केवळ आरोपींनाच पकडले नाही, तर मोठ्या प्रमाणात मुद्देमालही हस्तगत केला आहे:गोमांस: २०० किलो (किंमत ४०,००० रुपये) जीवंत जनावर: १ गोवंशीय जनावर (किंमत ५,००० रुपये) साहित्य: वजनकाटा, २ चाकू, सुरा, कुऱ्हाड आणि टोचा.इतर: २०,००० रुपयांचे दोन मोबाईल.एकूण जप्त मुद्देमाल: ६८,५०० रुपये.अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) आणि प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(क), ९ नुसार शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक लोकआरंभ
सोमवार १३ एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



## मुख्याध्यापकांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा; विद्यार्थ्यांना 'एक्झाम पॅड'चे वाटप





### सामाजिक कार्यकर्ते मुसाखान पठाण व शेख वसीम यांचा आदर्श

बीड / प्रतिनिधी :
बीड येथील मिल्लीया मुलांची प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक शेर खान सर यांच्या वाढदिवसानिमित्त एक वेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना 'एक्झाम पॅड' (परीक्षा पॅड) वाटप करून हा दिवस सामाजिक संदेश देत साजरा करण्यात आला.

या उपक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यर्ते शेख वसीम यांनी केले होते. कार्यक्रमात मुसाखान पठाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर पत्रकार पठाण अमरजान यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना एक्झाम पॅडचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाला शाळेतील शेख इमरान सर,शेख गफार सर,मोमीन अझरुद्दीन सर, शेख मुस्तमिल सर,शेख इकबाल सर,रफत मॅडम,नूजत मॅडम,फौजीया मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाढदिवस साजरा करताना समाजोपयोगी कार्य करण्याचा संदेश देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे.

## जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात शिवसेनेचे आमदार होणार : मनोज शिंदे

### पक्षप्रवेश, संघटनबांधणी आणि मतदारयादी शुद्धीकरणावर भर



बीड (प्रतिनिधी) शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत संपूर्ण बीड जिल्ह्यावर भगवा फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात शिवसेनेचे आमदार निवडून येतील असा ठाम आणि आत्मविश्वासपूर्ण दावा जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी केला.
आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने जिल्ह्यात संघटनात्मक ताकद वाढवण्यावर भर दिला असून जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघात बैठकींचा धडाका सुरू आहे. गावपातळीपासून शहरांपर्यंत शिवसैनिक सक्रिय झाले आहेत. घराघरात शिवसेना ही मोहीम राबवली जात असल्याचे चित्र आहे. विविध पक्षांतील नाराज कार्यकर्ते आणि स्थानिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने शिवसेनेत प्रवेश करत असल्याने पक्षाची ताकद दिवसेंदिवस वाढत असल्याचा दावा शिंदे यांनी केला.
यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जनसामान्यात असलेली लोकप्रियता शिवसेनेच्या बांधणीसाठी प्रभावीपणे उपयोगात आणली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.
मतदारयादी शुद्धीकरणावरही शिवसेनेने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. बीएलएच्या माध्यमातून पात्र नागरिकांची नावे मतदारयादीत समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात असून बोगस आणि संशयास्पद नावे वगळण्याचे काम हाती घेतले आहे. निवडणूक पारदर्शक आणि निष्पक्ष व्हावी, यासाठी शिवसेना कटिबद्ध आहे असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

## तीर्थ रेसी डेसी पवनपुत्र हॉलीबॉल संघ जालना येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

### पवनपुत्र हॉलीबॉल संघ मित्र मंडळाचा पुढाकार; मान्यवरांची उपस्थिती..





सोयगाव ता..
प्रतिनिधी सुनील चोरमले..
जालना येथील तीर्थ रेसिडेन्सी परिसरात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती पवनपुत्र हॉलीबॉल संघ मित्र मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विष्णुजी भोसले होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून अष्टपैलू खेळाडू शरद राव डोईफोडे उपस्थित होते. यावेळी प्रतिमा पूजन श्री दिनकरराव (बापू) भुतेकर पाटील व श्री जगदीश भुंबर यांच्या हस्ते करण्यात आले.
कार्यक्रमाला श्री यशवंत खंदारे, सुभाष घुले, श्री रामदास जारे, श्री झनक बहुरे, श्री विलास घुले, श्री मदनराव मोहिते, श्री किरण खरात (पाटील), कुमार स्वराज जारे, कुमार शिवराज भोसले, राजू सेठ पवार, महेश पवार, समर्थ बिराजदार, बंटी सेठ भुतेकर, मुंडे साहेब आदींची विशेष उपस्थिती होती.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवनपुत्र हॉलीबॉल संघाचे कॅप्टन श्री प्रकाश वाघमोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संतोष बिराजदार व दीपकराव खांडे यांनी मानले. शेवटी फराळ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला

# विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल केज येथे क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी.

### रांगोळी स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग..

केज ! प्रतिनिधी
विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूल, केज येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय बीड (डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड) यांच्या सूचनेनुसार हा कार्यक्रम राबविण्यात आला आहे.स्पर्धेचा शुभारंभ संस्थेचे विश्वस्त विजयकांत मुंडे व प्राचार्या माधुरीताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला.
यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत



महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांचे महत्त्व पटवून दिले व त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.यानंतर विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रांगोळी स्पर्धेला विशेष प्रतिसाद मिळाला.विद्यार्थ्यांनी 'शिक्षणाचे महत्त्व', 'समता व बंधुता' यांसारख्या विषयांवर आधारित सुंदर व आकर्षक रांगोळ्या साकारून सामाजिक संदेश दिला. त्यांच्या कलाकृतींमधून सर्जनशीलता व सामाजिक जाणीव स्पष्टपणे दिसून आली.तसेच वक्तृत्व स्पर्धाही उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यावर, स्त्री शिक्षणातील योगदानावर तसेच समाजसुधारणांवरील त्यांच्या विचारांवर प्रभावी भाषणे सादर केली. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्याची जडणघडण होत असल्याचे दिसून आले.
कार्यक्रमादरम्यान शिक्षकवृंदानेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत महात्मा फुले यांच्या कार्याचा सखोल परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शाळेचे शिक्षकवृंद लोकेश शहा सर,बन्साळी मॅडम,आदिती पाटील मॅडम,गणेश काळे सर,शरद चवरे सर,इंगळे सर,धनंजय मस्के सर, शीलवंत सर,अमर सर,ओम ठोंबरे सर, नवीन सर,सोमनाथ सर,रवी त्रिभुवन सर,शुभांगी सगरे मॅडम,सुमया आतार मॅडम,झीनत मॅडम,घोळवे मॅडम,राजमाने मॅडम,तेजश्री सगरे मॅडम,लीना त्रिभुवन मॅडम,अश्विनी मगर मॅडम,प्रणिता वाघमारे मॅडम,अश्विनी वडगावकर मॅडम,अश्विनी सुरवसे मॅडम,ओव्हाळ मॅडम,मेघा मोरे मॅडम,पल्लवी कुलकर्णी मॅडम,विशाखा मॅडम यांनी उत्कृष्ट पद्धतीने केले.शेवटी स्पर्धांमधील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. एकूणच हा कार्यक्रम ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

# पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांना कायद्याची एल एल एम पदवी प्रदान.

किल्ले धारूर/अविनाश जगताप
धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी नोकरी लागल्यानंतरही पुढील शिक्षण सुरू ठेवत कायद्याची पदव्युत्तर पदवी एल एल एम ची पदवी मिळवली असून त्यांना छत्रपती संभाजी नगर येथे पदवी समारंभामध्ये ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. एरवी नोकरी लागल्यानंतर व्यक्ती हा शांत होत असतो परंतु कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी पुढे आणखी शिक्षण चालू ठेवत मेहनतीने व जिद्दीने एक एक उंच शिखर ते मिळवत आहेत त्याचाच एक भाग म्हणून कायद्याची पदवी मिळवावी पदव्युत्तर शिक्षण मिळवावं ही त्यांची अतोनात इच्छा होती त्यांनी ते जिद्दीने शिक्षण पूर्ण करत कायद्याची मास्टर डिग्री त्यांनी मिळवली आहे
छत्रपती संभाजी नगर शहरात पदवी समारंभ संपन्न झाला या कार्यक्रमात किल्ले धारुर शहरातील पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस



निरीक्षक देविदास वाघमोडे यांना कायद्याची पदव्युत्तर पदवी ( एल.एल.एम.) पदवी देऊन सन्मानीत केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल धारूर शहरातच नव्हेत संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये अभिनंदन होत असून कौतुक केले जात आहे.
पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे हे आपल्या कर्तव्यात तत्पर मानले जातात. पोलीस खात्यातही त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे त्यांनीही कायद्याची पदवी मिळवल्याबद्दल त्यांचे धारूर शहरात सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार बांधव व शिक्षण प्रेमी नागरिकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत या तुम्हीच शिकायला मिळते की माणूस आयुष्यभर विद्यार्थी असतो शिक्षणाला वयाची अट लागत नाही मनामध्ये इच्छा असेल तर प्रत्येक काम आपण पूर्ण करू शकतो हे यातून दिसून येते.

# देवदुत ओमप्रकाश शेटे यांनी शाळेसाठी पुढाकार घेऊन चिमुकल्यांसाठी संजीवनी बनावं

### काळेगाव थडी जिल्हा परिषद शाळा मरणासन्न अवस्थेत ; झाडाखाली भरतेय वर्ग : - डॉ. गणेश ढवळे









बीड (दि.१२): माजलगाव तालुक्यातील काळेगाव थडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असून, विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. इमारत कधीही कोसळण्याची भीती असल्याने सध्या विद्यार्थ्यांचे वर्ग झाडाखाली भरत असल्याची गंभीर परिस्थिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू देवदुत म्हणून ओळखले जाणारे ओमप्रकाश शेटे यांनी या शाळेसाठी 'देवदूत' ठरून नव्या इमारतीसाठी शासन दरबारी पाठपुरावा करून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी संजीवनी बनावं अशी मागणी केली आहे.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असुन नविन शाळा इमारतीसाठी तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.
--- १९६३ ची इमारत; जीवघेणी परिस्थिती
शाळेची इमारत १९६३ साली विटा आणि चुन्यापासून बांधलेली असून सध्या ती अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. भिंतींना मोठे तडे गेले आहेत, पत्रे गंजून गळती होत आहे, तसेच सिमेंटचे खपले कोसळत आहेत. अनेकदा वर्गात साप व विंचू आढळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. "इमारत कधी कोसळेल याचा नेम नसल्याने विद्यार्थ्यांना झाडाखाली बसवून शिक्षण द्यावे लागत आहे. वारंवार वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नाही," अशी खंत मुख्याध्यापक बाळासाहेब काकडे यांनी व्यक्त केली. ---
मुलभूत सुविधांचा अभाव शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आगाजी तौर यांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही






शौचालयांची कमतरता पोषण आहारासाठी स्वतंत्र स्वयंपाकगृह नाही या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. --- "ज्ञान मंदिराकडेही लक्ष द्यावे" माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, शुक्लतीर्थ व वांगी देवस्थानांच्या विकासासाठी ओमप्रकाश शेटे यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद शाळांसारख्या "ज्ञान मंदिरां"कडेही लक्ष देऊन काळेगाव थडीसह इतर जीर्ण शाळांच्या इमारतींसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.

# राजकुवर महाविद्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी..



सोयगाव ता
प्रतिनिधी सुनील चोरमले
.. फर्दापूर येथील राजकुवर महाविद्यालयात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहा'निमित्त महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.
प्राचार्य प्रा. ए. जे. बेलवाड यांनी विद्यार्थ्यांनी फुले यांच्या विचारांचा अंगीकार करावा, असे आवाहन करत त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. बार्टीच्या समतादूतांनी शासकीय योजना, शिष्यवृत्ती, कौशल्य प्रशिक्षण व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाबाबत सविस्तर माहिती दिली.
७ ते १४ एप्रिलदरम्यान विविध जनजागृतीपर उपक्रम राबविले जात असून या कार्यक्रमात शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समतेची जाणीव निर्माण होऊन शासकीय योजनांविषयी जागरूकता वाढली.



बीड (प्रतिनिधी): तालुक्यातील नेकनूर येथील पठाण तुफेल यांची पुणे पोलीस दलात निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. मुजावर, डॉ. जावेद शेख, पत्रकार सय्यद अर्शद, शेख शाकेर, अब्दुल रौफ (जनाब) आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा; शिर्डीत आमीर खान यांनी वाहिली श्रद्धांजली

अहिल्यानगर/प्रशांत बाफना : ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन झालं असून वयाच्या 92 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. यावर अभिनेता आमीर खान यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी ते म्हणाले, "ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या जाण्याने देशासह संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मोठं नुकसान झालं आहे. मी आशा भोसले यांचा मोठा फॅन होतो. माझ्या दृष्टिनं ही मोठी हानी आहे. चार मोठे गायक होते. त्यात आशा भोसले, लता मंगेशकर, रफी व किशोरदा. आता त्यांच्यातील आशा भोसलेही राहिल्या नाहीत. त्यामुळं एका युगाचा अंत झाला. मी माझ्या वतीनं तसेच संपूर्ण देशातील त्यांच्या चाहत्यांसाठी व परिवारासाठी दुःख व्यक्त करतो. त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी अशी प्रार्थना करतो." महाराष्ट्रात शासन, पाणी फाउंडेशन, उमेद अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आजपासून शिर्डीत सुरू झालेल्या राज्यस्तरीय पाणी फाउंडेशन फार्मर कप कार्यशाळा या कार्यक्रमाला अभिनेता आमीर खान आणि किरण राव उपस्थित होते. कार्यक्रमाला सुरुवात होण्यापूर्वी अभिनेता मंचावर आल्यानंतर सूत्रसंचालिकेने कार्यक्रमाची सुरुवात करत असताना, आमीर खान यांनी थेट सूत्रसंचालिकेजवळ जाऊन सांगितलं की, कार्यक्रमाला सुरुवात करण्याआधी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनामुळं त्यांना आधी सर्वांनी श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाला सुरुवात करू. त्यानंतर सूत्रसंचालिकेने कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्वांना आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचं आवाहन केलं आणि सर्वांनी दोन मिनिटे श्रद्धांजली वाहिली. यानंतर कार्यक्रमाला सुरूवात झाली

# एपीआय बालाजी वैद्य सर यांना थेट पोलीस निरीक्षक (PI) पदावर पदोन्नती मिळाली



करीम लाला जालना जिल्हा प्रतिनिधी
भोकरदन शहरासाठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. भोकरदन पोलीस स्टेशनमध्ये मागील दोन वर्षांपासून उत्कृष्ट सेवा बजावणारे एपीआय बालाजी वैद्य सर यांना थेट पोलीस निरीक्षक (PI) पदावर पदोन्नती मिळाली असून त्यांची बदली अहमदनगर येथे करण्यात आली आहे. बालाजी वैद्य सर यांनी आपल्या कार्यकाळात भोकरदन शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अतिशय प्रभावी पद्धतीने काम केले. गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी त्यांनी कडक कारवाई करत अनेक प्रकरणांमध्ये तत्पर आणि निष्पक्ष निर्णय घेतले. त्यांच्या काम करण्याच्या धडाडीमुळे आणि शिस्तप्रिय स्वभावामुळे पोलीस विभागात तसेच नागरिकांमध्ये त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली होती. भोकरदनच्या नागरिकांनी त्यांच्या कार्याची नेहमीच प्रशंसा केली असून, "कडक पण न्याय्य अधिकारी" अशी त्यांची ओळख बनली होती. शहरातील अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण आणण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. त्यांच्या पदोन्नतीबद्दल भोकरदन शहरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

दैनिक
लोकआरंभ

सोमवार १३ एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



# मराठे पुन्हा आक्रमक होणार...

# मनोज जरांगे पाटलांचा आंदोलनाचा इशारा

## मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरण्याची भाषा केली



मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला आंदोलनाचा इशारा दिला आहे. मराठा आरक्षणाची घोषणा करताना सरकारने आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप गुन्हे मागे घेतले गेलेले नाहीत, त्यामुळे आता मराठे पुन्हा आक्रमक होण्याची शक्यता आहे. यावरूनच मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरण्याची भाषा केली आहे. जरांगे पाटलांनी नेमकं काय म्हटलं याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

जरांगे पाटलांकडून आंदोलनाचा इशारा

मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले की, 'सरकारने शब्द दिला होता की, सर्व गुन्हे मागे घेतले जातील. जो पर्यंत सर्व गुन्हे मागे घेतले जाणार नाही तो पर्यंत मी शांत बसणार नाही. सरकारने तसा शब्द दिलेला आहे. नाहीतर सर्वात मोठं आंदोलन उभं करून सर्व गुन्हे मागे घेण्यास भाग पाडू. दाखल गुन्ह्यांपैकी 60- 62 गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. त्याबाबत सरकारने अहवाल देऊन हे गुन्हे मागे घ्यायला हवे. 80 गुन्हे असे आहेत त्याबाबत विभागीय समितीने अहवाल देऊन हे गुन्हे मागे घ्यायला लावावेत. सरकार आणि फडणवीस जरी त्यांनी दिलेल्या शब्दापासून बदलले असले तरी त्यांना मी बदलू देणार नाही. कसे गुन्हे मागे घेत नाही मी बघतो, मी खंबीर आहे.' मराठा उपसमितीवर टीका

मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्णन विखे पाटील यांच्याबाबत बोलताना जरांगे म्हणाले की, 'जी उपसमिती मराठ्यांची स्थापन झालीये त्यांनी मराठ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला हवं, त्यांनी दिखावा करण्यासाठी थातुर मातूर बैठका घेऊ नयेत. मराठा समाजाला उप समितीच्या अध्यक्षकडून अपमानास्पद वागणूक चालू आहे, ती थांबली पाहिजे. त्यांना समज पाहिजे मराठा समाजाला न्याय मिळवून दिला पाहिजे.

## इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी थेटेगव्हाण आश्रमशाळेत प्रक्रिया सुरु



Image credit: istockphoto.com/helenecanada

किल्ले धारूर /प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण कॅम्प कांदेवाडी येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी इयत्ता पहिलीच्या इंग्रजी माध्यम निवासी आश्रमशाळेतील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अंतर्गत येणाऱ्या बीड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याबाबतची माहिती शाळेचे मुख्याध्यापक सखाराम वनवे यांनी शासकीय प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

शासनाच्या धोरणानुसार व अटी-शर्तींच्या अधीन राहून या प्रवेशाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. प्रवेश नोंदणीची मुदत 13 ते 30 एप्रिल 2026 दरम्यान असून, सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

इच्छुक पालकांनी संबंधित शाळेत भेट देऊन विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज घेऊन तो वेळेत सादर करावा, असे आवाहन मुख्याध्यापक सखाराम वनवे यांनी केले आहे.

## म.फुले जन्मोत्सव जयभीम नगर मध्ये उत्साहात साजरा




माजलगाव प्रतिनिधी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांचे जन्मोत्सवानिमित्त जय भीम नगर माजलगाव येथील फुले आंबेडकर जन्मोत्सव समितीच्या वतीने मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मोत्सवाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांना बाबासाहेब आंबेडकरांनी गुरु का मानले या विषयावर सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संजय बागुल यांचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक जय भीम नगर माजलगाव सायंकाळी सात वाजता आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचा विषय होता महात्मा ज्योतिबा फुले यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरु का मानले

आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात बोलताना प्राध्यापक संजय बागुल म्हणाले की बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक मुक्कामी 1951 साली सांगितले की माझे पहिले गुरु तथागत भगवान गौतम बुद्ध आहेत दुसरे गुरु संत कबीर आहेत व तिसरे गुरु महात्मा ज्योतिबा फुले हे आहेत हे तिन्ही महापुरुष यांची व बाबासाहेब आंबेडकरांची प्रत्यक्ष जीवनात कधीही भेट झालेली नव्हती व ते वेगवेगळ्या जातींचे होते परंतु त्यांचे विचार वाचनात येऊन त्यांच्या विचार बाबासाहेबांच्या विचाराची मिळाल्याने बाबासाहेबांनी त्यांना गुरु मानले. बाबासाहेब आंबेडकरांच्या तिन्ही गुरु पैकी पहिले गुरु सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी रोहिणी नदीच्या पाण्यासाठी दोन राज्यांमध्ये युद्ध न करता ग्रह त्याग केला तर दुसरे गुरु महात्मा ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांना पाण्यासाठी आपला स्वतःच्या मालकीचा हौद रिकामे केला या आपल्या गुरूचा आदर्श घेऊनच बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह पाण्यासाठी केला

महात्मा फुले हे गरीब नव्हते फार श्रीमंत होते परंतु ते माळी या शूद्र जाती जन्माला आलेले असल्याने त्यांच्या मित्राच्या लग्नातून महात्मा फुलेंना हाकलून देण्यात आले होते त्याचा विचार करून मंथन करून महात्मा फुलेंनी या जाती कोणी व कशा निर्माण केल्या याचा शोध लावला व त्यांच्या लक्षात आले की जाती या निर्मिकाने निर्माण केलेल्या नसून माणसानेच त्याच्या स्वार्थासाठी जाती निर्माण केलेले आहेत म्हणून त्यांनी सर्व मानव महिला व पुरुष हे समान असले पाहिजेत ही शिकवण दिली. तसेच मनुस्मृतीनुसार महिलांना पतीच्या निधनानंतर सती जावे लागत असे त्यांचे केस ओपन केल्या जात असे व त्यांना विविध प्रकारचे बंधने टाकण्यात आलेले आहेत असेच एक ब्राह्मण समाजातील विधवा महिला काशीबाई या विधवेला नवरा वारल्याच्यानंतर गर्भवती राहिल्याने आत्महत्या करण्याचा प्रसंग आला होता महात्मा फुलेंनी त्या काशीबाई नावाच्या ब्राह्मण महिलेला आपल्याकडे आणले व तुझा एक भाऊ म्हणून तुझ्या मुलाचे पालन पोषण करीन असे सांगून विधवा महिलांना गर्भवती राहिल्यानंतर प्रसूती करून घेण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक ग्रह काढले.

महात्मा फुलेंचे शिष्य म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये महिलांसाठी हिंदू कोड बिल निर्माण करून महिलांना हक्क अधिकार मिळवून दिले महात्मा ज्योतिबा फुले यांनी तत्कालीन इंग्रजांचे राजपुत्र पुण्यात आले असताना त्यांना भेटण्यासाठी महात्मा फुले शेतकऱ्यांच्या पेहरावात कार्यक्रमाला जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा इंग्रज दरबारी मांडल्या अशी ते शेतकऱ्यांची नेते होते म्हणून त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ सुद्धा लिहिला होता व त्यांचे शिष्य बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांसाठी 1954 साली फार मोठा मोर्चा काढून त्यांच्या समस्याना वाचा फोडण्याचे काम केले होते तसेच कोकणातील शेतकऱ्यांसाठी खोती पद्धती बंद करण्यासाठी ही मोर्चे काढले होते परंतु आज काल शेतकऱ्यांच्या नावाने अनेक नेते मंडळी काम करतात व स्वार्थ साधून घेतात परंतु खरे शेतकऱ्यांचे नेते हे महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच होते असेही प्रा. बागुल यांनी सांगितले यावसंगी अविनाश बनसोडे, रूपचंद कांबळे, चंद्रमणी डोंगरे, विजय पोळ, नगरसेवक सदानंद भैया प्रधान नगरसेवक रफिक भैया दीपक टाकणखार पत्रकार किशन भदर्गे पत्रकार प्रा. सुदर्शन स्वामी, शिक्षक नेते राजकुमार सोनवणे सर,राजेश पोटभरे अशोक डोंगरे लक्ष्मण पोटभरे सर अशोक मगर दिनेश निसर्गंध, अतुल भैय्या भदर्गे विनय पोटभरे राजू कांबळे यांच्यासह जय भीम नगर फुले आंबेडकर जयंती महोत्सव समिती व सर्व समाज बांधव उपस्थित होते

# महात्मा फुले यांचे समतेचे विचार घराघरात पोचवा ÷ डॉ.रामपाल धारकर महाराज

## माजलगावात महात्मा फुले जयंतीनिमित्त भव्य व्याख्यान संपन्न





माजलगाव (प्रतिनिधी) – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त दि. ११ एप्रिल रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला माजलगाव शहर व परिसरातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून समतेच्या विचारांचा लाभ घेतला.

कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. रामपाल धारकर महाराज यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांची प्रभावी मांडणी करत समाजात समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व अधोरेखित केले. "महात्मा फुले यांचे समतेचे विचार घराघरात पोहोचवणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच अजय शिंदे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी युवा नेते दत्ता विसवळे होते. यावेळी बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे, भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, माजी समाजकल्याण सभापती कल्याण आबुज, माजी नगराध्यक्ष डॉ. अशोकराव तिडके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून शिवप्रसाद खेत्री, आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, शेतकरी नेते ॲड. नारायण गोले, ओबीसी नेते लक्ष्मणराव गायकवाड, भाजपा नेते ज्ञानेश्वर सरवदे, बळीराम यादव, धनगर समाजाचे नेते संतोष देवकते, वंचितचे नेते धम्मानंद साळवे, बहुजन समाज पार्टीचे ॲड. अमोल डोंगरे, शेतकरी नेते अजय राऊत, डॉ. किशोर भोपळे, युवा नेते रोहित वगरे, सरपंच रुक्मानंद खेत्री, प्रल्हाद दळवी, तुकाराम नावडकर, गणेश सातपुते, सखाभाऊ गोबरे, सुधाकर रासवे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद गोचडे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन ओबीसी नेते विलास नेमाणे व युवा नेते किशोर पांचाळ यांनी केले. तसेच कमिटी सदस्य दशरथ आढाव, श्रीराम कोरडे, मयूर पांचाळ, भाई मुंजा पांचाळ, गंगाराम ढगे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

या व्याख्यान कार्यक्रमाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या समतेच्या विचारांचा प्रभावी संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्यात आला.


## छत्तीसगड जुनिअर चॅम्पियनशिप : सुमितकुमारची सुवर्ण कामगिरी



माजलगाव :( प्रतिनिधी ): छत्तीसगड येथे ता. ११ एप्रिल रोजी नुकत्याच राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धा पार पडल्या. सदरील राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप स्पर्धेत ७० किलो वजन गटात शहरालागत असणाऱ्या पुनर्वसित शेलापुरी येथील अष्टपैलू पैलवान सुमितकुमार अप्पासाहेब भारस्कर याने शेवटच्या अंतिम सामन्यात दमदार खेळी करत हरियाणा येथील मल्लास पराभूत करून सुवर्णपदकावर आपल नाव कोरत सुवर्ण कामगिरी केली. सदरील स्पर्धेसाठी कोच नरेंद्र कुमार, समीर देसाई, अनिरुधसर, कांबळे सर यांनी मार्गदर्शण केले.अतिशय संघर्षातून कुठलीही आखीव रेखीव पार्शवभूमी नसताना पैलवान सुमितकुमार भारस्कर याने आपल्या जिद्दीच्या जोरवार प्रचंड मेहनतीने विविध स्पर्धेत अनेक सुवर्ण पदकांची कमाई केली असून, सध्या सुमितकुमार हा रुस्तुम ए हिंद पै अमोल बचूडे कुस्ती संकुल येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत असून, तो सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. तसेच लवकरच तो आपल्या देशासाठी इंटरनॅशनल खेळणार असून,आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याला प्रतिनिधित्व मिळणार असल्याने या सुवर्ण कामगिरी बद्दल पैलवान सुमिकुमारचे सामाजिक, राजकीय तसेच विविध समाज माध्यमातून त्याच्यावर शुभेच्छा चा वर्षाव होत असून, सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# "रस्ता की भ्रष्टाचाराचा महामार्ग? माजलगावात 'अनुसया कन्स्ट्रक्शन'वर निकृष्ट कामांचा स्फोट!"

## डांबराऐवजी 'डुप्लिकेट' साहित्य? रस्ता पूर्ण होण्याआधीच उखडला; ग्रामस्थांचा संताप उसळला, आंदोलनाचा इशारा



माजलगाव प्रतिनिधी.

माजलगाव तालुक्यात विकासकामांच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित गैरव्यवहाराचा मोठा भंडाफोड झाला असून, सोन्नाथडी ते खरात आडगाव चौपाळा या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात गंभीर अनियमितता झाल्याचे समोर आले आहे. संबंधित काम करणाऱ्या 'अनुसया कन्स्ट्रक्शन'वर ग्रामस्थांनी थेट आरोप करत संताप व्यक्त केला आहे. "हा रस्ता नसून भ्रष्टाचाराचा महामार्गच तयार केला जातोय," अशी तीव्र प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांच्या मते, रस्त्याच्या कामात अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले आहे. डांबराऐवजी हलक्या प्रतीचे आणि संशयास्पद मिश्रण वापरल्याने रस्ता पूर्ण होण्याआधीच उखडू लागला आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांत खड्डे पडल्याने या कामाच्या गुणवत्तेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून शासनाच्या निधीची उघड लूट असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकरणात संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांची भूमिका देखील संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. गुणवत्ता नियंत्रणाच्या सर्व नियमांना जाणीवपूर्वक पायदळी तुडवत ठेकेदाराला मोकळीक दिली जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. "अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय एवढ्या उघडपणे निकृष्ट काम होऊच शकत नाही," असा थेट आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून शेतकरी, विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवास करणारे नागरिक यावर अवलंबून आहेत. मात्र, निकृष्ट कामामुळे रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांचे हाल होत आहेत. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे संताप अधिकच तीव्र झाला आहे. ग्रामस्थांनी या प्रकरणी तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून दोषींवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर अधिक तीव्र झाला आहे. "आम्ही आता शांत बसणार नाही. जर त्वरित कारवाई झाली नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल," असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. लवकरच निवेदन देऊन आंदोलनाची दिशा ठरवली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणामुळे संपूर्ण माजलगाव तालुक्यात खळबळ उडाली असून प्रशासनाची विश्वासार्हता पुन्हा एकदा प्रश्नचिन्हाखाली आली आहे. आता प्रशासन दोषींवर कारवाई करून जनतेचा विश्वास परत मिळवणार की हे प्रकरणही दडपले जाणार, म्हणून सर्वांचे लक्ष लागले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com